वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था माटुंगा, मुंबई या अनुदानित अशासकीय संस्थेच्या नियामक मंडळावर अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : १६२५०३२-HTED-११०११ (११)/१७/२०२६/तांशि-२**

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : - २४ एप्रिल , २०२६

**संदर्भ:** १. विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजीची अधिसूचना

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था आणि संचलित किंवा घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याबाबतची मानके) एकरूप परिनियम, २०१८, दिनांक १४ जानेवारी, २०२२

३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १११९/(११३/२२)/तांशि-२, दिनांक ०६ डिसेंबर, २०२२

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र.१ व २ वरील अधिसुचनेतील तरतुदीनुसार वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था माटुंगा, मुंबई या अशासकीय अनुदानित संस्थेच्या नियामक मंडळाचे गठन तसेच अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती ही संदर्भ क्र.३ वरील शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे . सदर नियुक्तीची मुदत दिनांक ०५.१२.२०२५ रोजी संपुष्टात आलेली आहे. सबब, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था माटुंगा, मुंबई या अशासकीय अनुदानित स्वायत्त संस्थेच्या नियामक मंडळावर नवीन अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI), माटुंगा, मुंबई या अशासकीय अनुदानित संस्थेच्या नियामक मंडळावर विश्वस्त मंडळाकडुन नामनिर्देशनाने अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे-

| अ.क्र. | प्रवर्ग व संख्या | नियुक्त व्यक्ती |
|---|---|---|
| अ | **व्यवस्थापनाद्वारे नियुक्त सदस्य (५)** | १) डॉ. सुधीर मेहता, (अध्यक्ष)<br>अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पिनॅकल इंडस्ट्रीज लि., शिवाजीनगर, पुणे |

| | | |
|---|---|---|
| | | २) पी.व्ही.एस. मुर्ती, (सदस्य),<br>माजी ग्लोबल हेड, टीसीएस सायबर सेक्युरिटी<br>३) प्रा.बी.ई. नारखेडे, (सदस्य),<br>प्राध्यापक, आय.आय.एम. मुंबई<br>४) श्री. सुब्रमन्यन चिदंबरम, (सदस्य),स्ट्रॅटेजी हेड, कमिन्स<br>५) श्री. राजन टिपनीस, (सदस्य)<br>अध्यक्ष, आर.सी.टिपनीस कन्स्लटींग इंजि. |
| **ब** | **शिक्षक प्रतिनिधी (२)** | संस्थेचे संचालक/ प्राचार्य यांचेकडून सेवाज्येष्ठतेनुसार आळीपाळीने नामनिर्देशित **(२ सदस्य)** |
| **क** | **उद्योजक / शिक्षणतज्ञ (१)** | श्रीमती उषा मराठे, **(सदस्य)**<br>ग्लोबल डिलेवरी पार्टनर, कॅपजेमिनी |
| **ड** | **विद्यापीठ अनुदान आयोग प्रतिनिधी (१)** | विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत नामनिर्देशित (सदस्य) |
| **इ** | **राज्य शासन प्रतिनिधी (१)** | संचालक , तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य (सदस्य) |
| **ई** | **विद्यापीठ प्रतिनिधी (१)** | संबंधित विद्यापीठाकडून नामनिर्देशित (सदस्य) |
| **फ** | **पदसिध्द सचिव** | संचालक/ प्राचार्य, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI), माटुंगा, मुंबई (सदस्य सचिव) |

२. संचालक/प्राचार्य, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था यांनी शिक्षक प्रतिनिधी, विद्यापीठ अनुदान आयोग प्रतिनिधी व विद्यापीठ प्रतिनिधी यांच्या नियुक्तीबाबत संस्थास्तरावरून कार्यवाही करावी.

३. उपरोक्त नियामक मंडळाची मुदत ३ वर्षे कालावधीकरिता असेल. तथापि, विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे नामनिर्देशित व्यक्तीची मुदत ५ वर्षे इतकी असेल.

४. या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या नियामक मंडळांच्या बैठकांसाठी तथा संस्थेच्या निगडीत अन्य कामकाजासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष तथा सदस्य यांना महाराष्ट्र राज्याच्या सचिव स्तरावरील अधिकाऱ्यास देय असणाऱ्या प्रवासाच्या सवलती, प्रवास भत्ता व बैठकभत्ता देय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२४१६०४५०८००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH PUNAMCHAND KHORGADE

Digitally signed by SANTOSH PUNAMCHAND KHORGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Higher and Technical Education,
2.5.4.20=C0546ACCA372CE2D8EDBE5DC7949386DAF8955A34DFDA38BF6F34CE12B899EA7, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=08CF3286085F1309FD153E0C9A31F18D1C3CE4865E7DF75B4F8AA7B75A9A81EA, cn=SANTOSH PUNAMCHAND KHORGADE
Date: 2026.04.24 16:05:46 +05'30'

**(संतोष खोरगडे )**

**सहसचिव , महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपाल, तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६) मा. सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
७) मा. सचिव, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
८) मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.
९) मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१०) संचालक, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली
११) अध्यक्ष व सदस्य , नियामक मंडळ , वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI), मुंबई
१२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण
१५) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१७) महालेखापाल (लेखापरीक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
१८) अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/ निवासी लेखा परीक्षा अधिकारी
१९) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२०) कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
२१) कुलसचिव,सर्व अकृषी विद्यापीठे
२२) उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई
२४) निवड नस्ती - तांशि-२.